# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः02.06.2025** **वारःसोमवार**

---

आकाशवाणी पुणे, राजेंद्र लेले प्रादेशिक बातम्या देत आहे.

नाशिकमध्ये पुढच्या वर्षी होणाऱ्या कुंभमेळयाचं वेळापत्रक जाहीर; नाशिकचा कुंभमेळा ऐतिहासिक ठरेल असा मुख्यमंत्र्यांचा विश्वास
पहिल्या आंतरराष्ट्रीय कृषी हॅकॅथॉनचं पुण्यात उद्घाटन; राज्याची शेती डिजिटल युगात जगासाठी दिशादर्शक ठरेल - उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं प्रतिपादन
आय पी एल क्रिकेटमध्ये किंग्ज इलेव्हन पंजाब संघ अंतिम फेरीत दाखल; विजेतेपदासाठी-रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाबरोबर उद्या लढत
आणि
मान्सूनचा प्रवास रखडल्यानं शेतकऱ्यांनी पेरणीची घाई न करण्याचा- कृषी विभागाचा सल्ला

**<u>मुख्यमंत्री कुंभमेळा</u>**

नाशिक आणि त्र्यंबकेश्वरमध्ये पुढच्या वर्षी होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळयाच्या वेळापत्रकाची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नाशिकमध्ये केली. नाशिकमध्ये होणाऱ्या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी काल आढावा बैठक घेतली; यावेळी कुंभमेळ्यातील अमृतस्नानाच्या तारखा घोषित करण्यात आल्या. पुढच्या वर्षी 31 ऑक्टोबर रोजी दुपारी बारा वाजून दोन मिनिटांनी सिंहस्थाला प्रारंभ होणार आहे. त्यानंतर नाशिकमध्ये प्रथम अमृतस्नान 2 ऑगस्ट 2027 ला होणार आहे; तर दुसरं अमृतस्नान 31 ऑगस्ट 2027 आणि तिसरं अमृत स्नान 11 सप्टेंबर 2027 रोजी होणार आहे. त्रंबकेश्वरमध्ये देखील 31 ऑक्टोबर 2026 रोजी ध्वजारोहण होणार असून पहिलं अमृतस्नान 2 ऑगस्ट 2027, दुसरं 31 ऑगस्ट 2027 आणि तिसरं अमृत स्नान 12 सप्टेंबर 2027 रोजी होणार आहे.

नाशिकमध्ये होणारा कुंभमेळा ऐतिहास स्वरूपाचा असेल, असं प्रतिपादन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केलं. कुंभमेळयासाठी प्रशासनानं  जय्यत तयारी केली आहे. सुमारे 6 हजार कोटी रुपयांच्या कामांच्या आराखड्यापैकी कामांच्या 4  हजार कोटी रुपयांच्या निविदा मागविण्यात आल्या आहेत, तर दोन हजार कोटी रुपयांच्या निविदा - प्रक्रियेत आहे. निविदा मागवून प्रक्रियेत असलेली कामं  जानेवारी महिन्यापर्यंत पूर्ण होतील असं मुख्यमंत्र्यांनी पत्रकार परिषदेत सांगितलं. नाशिक आणि त्र्यंबकेश्वर इथे  होणाऱ्या कुंभमेळ्यासाठी सर्व साधु महंतांचं सहकार्य लाभत आहे, कुंभमेळ्यासाठी कोणत्याही प्रकारे नीधीची कमतरता जाणवू दिली जाणार नाही असंही फडणवीस यांनी सांगितलं. यावेळी मंत्री गिरीश महाजन, दादा भुसे यांच्यासह अन्य लोकप्रतिनिधी आणि अधिकारी उपस्थित होते.

**<u>मुख्यमंत्री</u>**

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या “चक्र” या उत्कृष्टता केंद्राचं भूमिपूजन आणि संकेतस्थळाचं उद्घाटनही काल नाशिकमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झालं. विद्यापीठं ही केवळ शिक्षणसंस्था आणि अभ्यासक्रम नियोजन करणारी संस्था ठरू नयेत , तर संशोधन, नवोन्मेष आणि स्टार्ट अप सुरू करणारी केंद्र  व्हावीत. त्यादृष्टीने महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचं उत्कृष्टता केंद्र उपयुक्त ठरेल, असा विश्वास फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला. नाशिक इथे  परशुराम भवन या वास्तूचं लोकार्पणही काल फडणवीस यांच्या हस्ते झालं. महाराष्ट्रासह देशाच्या इतिहासात चित्पावन ब्राह्मण समाजातल्या नामवंतांनी प्रत्येक क्षेत्रात महत्वाचं योगदान दिलं असल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

**<u>कृषी हॅकेथॉन</u>**

देशात आणि राज्यात कृषी क्षेत्राच्या विकासाची प्रचंड क्षमता आहे; कृषी क्षेत्रात शाश्वत आणि सर्वसमावेशक विकासाला वाव देऊन अनेक संधीचा   लाभ देता येऊ शकतो, असं प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल पुण्यात केलं. राज्याचा कृषी विभाग, महात्मा फुले कृषी विद्यापीठ आणि विविध आंतरराष्ट्रीय संस्थांच्या सहकार्यानं देशातल्या पहिल्या आंतरराष्ट्रीय कृषी हॅकेथॉनचं पुण्यात आयोजन करण्यात आलं आहे; त्याच्या उद्घाटन समारंभात पवार बोलत होते. कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. यावेळी बोलताना अजित पवार म्हणाले.....

शेती फक्त शेतकऱ्यांची जबाबदारी नसून  उद्योग,शास्त्रज्ञ,शासन आणि समाज यांचं संयुक्त उत्तरदायित्व आहे. या हॅकेथॉन मधून जे काही उपक्रम, उपाय आणि कल्पना पुढं येणार आहेत त्यांना आम्ही शासनातर्फे विचारात घेणार

आहोत आणि योग्य असल्यास त्याची पायलट तत्वावर अमलबजावणी करण्यासाठी देखील आमचं सरकार आणि कृषि विभाग पुढाकार घेईल. शेती हि केवळ अन्न देणारी व्यवस्था नसून ती संस्करूटीओ, पर्यावरण आणि अर्थव्यवसाठेचा आधार आहे हि समज ठेऊन जर एकत्र येऊन आपण काम केलं तरमहाराष्ट्राची शेती डिजिटल युगात शेती जगाला दिशा देणारी ठरेल याबद्दल मला विश्वास वाटतो.

भविष्यात शेती, सुरक्षित आणि संरक्षित कशी करता येईल यादृष्टीने शासन प्रयत्न करत आहे, असं कोकाटे यावेळी म्हणाले. या कृषी हॅकेथॉन उपक्रमात 140 जणांची निवड झाली आहे. हे सर्व जण प्रदर्शनात सहभागी होऊन सादरीकरण करणार आहेत. यातून अंतिम 16 जणांची निवड होईल. उद्या, 3 जून रोजी उपक्रमाचा समारोप होणार आहे.

**बाईट-सह्याद्रीबातम्या**

देशभरात सध्या विकसित कृषि संकल्प अभियान राबवण्यात येत आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर, कागल, भुदरगड; आजरा, गडहिंग्लज आणि चंदगड या तालुक्यांमध्ये भारतीय कृषी अनुसंधान परिषद आणि श्री सिद्धगिरी कृषि विज्ञान केंद्राच्या शास्त्रज्ञांचं पथक- विविध गावांना भेट देऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करत आहे. याबाबत करवीर तालुक्यातील शेतकरी दशरथ पाटील यांनी समाधान व्यक्त केलं आहे.......

आता हा पावसाळी हंगामाच्या वेळी घेतलाय त्यावेळच्या अडचणी वेगळ्या,सुरुवातीच्या अडचणी वेगळ्या. पावसाळ्यानंतर ज्या अडचणी येणार त्यावर जर मार्ग निघाला तर शेती उत्पादन किंवा शासनाची योजना सक्सेसफुल चांगली चालणार आहे.आणि शेतकऱ्यांच्या जीवनमानात आणि उत्साहात भर पडणार आहे. शेती उत्पादन वाढणार आहे, भविष्यकाळात अशाच उपकरांची गरज आहे.

**हत्ती**

चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा- अंधारी व्याघ्र प्रकल्पात रानटी हत्तींचा शिरकाव झाला आहे. या अभूतपूर्व घटनेचं विवेचन करणारा - हा वृत्तांत...

ताडोबा-अंधारी प्रामुख्यानं व्याघ्र पर्यटनासाठी लोकप्रिय आहे. इथल्या अन्नसाखळीच्या शीर्षस्थानी वाघ आहे. जगण्यासाठी अन्नाकरिता हत्तीसोबत त्याचा संघर्ष नसला तरी दोघांनाही आपापली जागा लागते. वाघाद्वारे पर्यटकांवर हल्ला होण्याची शक्यता कमी असते, जंगली हत्तीचा स्वभाव पाहता त्याच्यापासून मानवाला सुरक्षित अंतरच राखावं लागतं. या पार्श्वभूमीवर वनविभागाच्या 25 कर्मचाऱ्यांचं पथक या हत्तींच्या हालचालींवर पाळत ठेवत आहे. अलिकडेच काही हत्तींनी गडचिरोली शहरातून रात्रीच्या वेळी फेरफटका मारला होता. आता त्यांनी ताडोबातील बफर क्षेत्रातल्या घनदाट जंगलातून डोनी गावानजीकच्या गाभा क्षेत्रात प्रवेश केला आहे. भरपूर पाणी, मोहफुलं आणि धान यांच्यासाठी हे हत्ती कोणत्याही भागात शिरु शकतात.  दोन दिवसांपूर्वी सिंदेवाही तालुक्यातल्या कुकडहेटी परिसरात रानटी हत्तींनी प्रवेश केल्यानंतर गोंधळ उडाला होता.

पावसाळ्यासाठी जंगल बंद केले नसले तरी काही भागात सतर्कता म्हणून प्रवेश बंदी करण्यात आली आहे. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी, चंद्रपूरहून मंगेश बेले यांच्यासह, मनोज क्षीरसागर, पुणे.

**वसतिगृह**

सामाजिक न्याय विभागाच्या वसतिगृहांमध्ये अत्याधुनिक सुविधा देणार असून राज्यातील 125 वसतिगृहांसाठी बाराशे कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, असं प्रतिपादन सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी काल केलं. सांगली जिल्ह्यातील मिरज इथे शासकीय वसतिगृहांच्या नूतन इमारतींचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. भविष्यात भाडे तत्त्वावरील वसतिगृहं शासकीय इमारतीत व्हावीत, यासाठी प्रयत्न करणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

**वृक्षारोपण**

सातारा जिल्हा सृष्टी सौंदर्यानं आणि झाडा-झुडपांनी नटलेला आहे; यात आणखी भर पडावी, यासाठी प्रत्येक वर्षी 1 जून रोजी हरित सातारा उपक्रम राबवणार असल्याचं सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केलं. सातारा सार्वजनिक बांधकाम मंडळ आणि सातारा नगर परीषदेच्या वतीनं साताऱ्यात वृक्ष लागवड अभियानाला प्रारंभ झाला; त्यावेळी ते बोलत होते. या अभियानात विविध प्रकारची 2,800 झाडे लावण्यात येणार आहेत.

**आयपीएल**

आय पी एल क्रिकेट मध्ये यंदा नवा विजेता मिळणार असल्याचं निश्चित झालं आहे. काल झालेल्या क्वालिफायर टू सामन्यात किंग्ज इलेव्हन पंजाब संघाने मुंबई इंडियन्स संघाचा 5 गडी राखून पराभव करत अंतिम फेरी गाठली. मुंबईने दिलेलं 203 धावांचं आव्हान पंजाबने कर्णधार श्रेयस अय्यरच्या नाबाद 87 धावांच्या जोरावर एक षटक राखून सहज पार केलं. आता विजेतेपदासाठी किंग्ज इलेव्हन पंजाब आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात उद्या अहमदाबाद इथे लढत होणार आहे.

**शेतकरी सल्ला**

राज्याच्या बहुतांश भागात पावसानं विश्रांती घेतली आहे; त्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, असा सल्ला राज्याच्या कृषी विभागानं पुन्हा एकदा दिला आहे. बदललेल्या वातावरणामुळे मान्सूनच्या प्रवासाची गती कमी होण्यास सुरुवात झाली आहे,

किमान 10 जूनपर्यंत तरी मान्सूनचा प्रवास थांबणार असल्याचा अंदाज आहे, त्यामुळे राज्यात तुरळक ठिकाणी हलका पाऊस पडण्याचा अंदाज आहे. तर बहुतांश भागात कोरडं हवामान अपेक्षित आहे, या कोरड्या हवामानाचा पेरणी आणि लागवडीवर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणी आणि लागवडीची घाई करू नये, असं आवाहन कृषी विभागानं केलं आहे.

**<u>हवामान</u>**

दक्षिण कोकणात आज मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. विदर्भात तुरळक ठिकाणी वीजा आणि जोराचे वारे यांच्यासह पाऊस पडण्याची शक्यता आहे.

आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.